# मेट्रो 3 : धारावी ते सांताक्रुझ पॅकेज ५चे काम अधिक वेगवान

नम्रता सावंत-कदम

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेचे काम सध्या अत्यंत वेगाने सुरू आहे. या मार्गिकेदरम्यानच्या ७ पॅकेजपैकी पॅकेज ५ चे भुयार खणण्याच्या कामाला अधिक गती देण्यात आली आहे. आतापर्यंत संपूर्ण ५२ किमी. भुयारापैकी २३ किमी.चे भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

| पॅकेज | मेट्रो स्थानक | भुयार मीटरमध्ये | काम पूर्ण झालेले भुयार |
|---|---|---|---|
| पॅकेज १ | कफ परेड ते सीएसएमटी स्थानक | ५८९४ मीटर | १८५३ मीटर |
| पॅकेज २ | सीएसएमटी मेट्रो ते मुंबई सेंट्रल | ७६४० मीटर | ४१८० मीटर |
| पॅकेज ३ | मुंबई सेंट्रल ते वरळी स्थानक | ७२९० मीटर | ६८० मीटर |
| पॅकेज ४ | वरळी ते धारावी स्थानक | १०९६० मीटर | ६२६७ मीटर |
| पॅकेज ५ | धारावी ते सांताक्रुझ, आग्रीपाडा | ७९९२ मीटर | ४७४४ मीटर |
| पॅकेज ६ | आग्रीपाडा ते टी २ टर्मिनल | ६९३७ मीटर | १८९९ मीटर |
| पॅकेज ७ | टी २ टर्मिनल ते सारीपूत नगर | ७०७९ मीटर | ३४१७ मीटर |

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या ३३.५ किमी. भुयारी मेट्रो मार्गिकेचे काम कफ परेड ते सीएसएमटी मेट्रो स्थानक पॅकेज १, सीएसएमटी मेट्रो ते मुंबई सेंट्रल पॅकेज २, मुंबई सेंट्रल ते वरळी मेट्रो स्थानक पॅकेज ३, वरळी ते धारावी पॅकेज ४, धारावी ते आग्रीपाडा पॅकेज ५, आग्रीपाडा ते आंतरराष्ट्रीय विमानतळ पॅकेज ६, टी २ टर्मिनस ते सारीपूत नगर पॅकेज ७ अशी विभागणी करण्यात आली आहे. या मेट्रो स्थानकातील भुयार खणण्यासाठी कृष्णा, वैनगंगा, तानसा, सूर्या, गोदावरी अशा महाराष्ट्रातील नद्यांची नावे दिलेली टीबीएम्स कार्यरत आहेत.

कृष्णा १ आणि २ या दोन टनेल बोअरिंग मशीन नयानगर धारावी येथील लॉन्चिंग शाप्टमधून २१ सप्टेंबर २०१७ आणि १८ ऑक्टोबर २०१७ रोजी भूगर्भात उतरवण्यात आला होत्या. या दोन्ही मशिन्सचे काम अत्यंत वेगाने होत असल्यानेच पॅकेज ५ मधील भुयार खणण्यात यश आले असल्याचे सांगण्यात आले आहे. कुलाबा-वांद्रे हा पहिला टप्पा डिसेंबर २०२१ पर्यंत कार्यान्वित करण्याचा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा मानस आहे. या प्रकल्पांतर्गत १७ टनेल बोअरिंग मशीन कार्यरत असून आतापर्यंत १० भुयारे खणण्यात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला यश मिळाले आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून दक्षिण मुंबईतील अत्यंत दाटीवाटीच्या गिरगाव, काळबादेवी परिसरातील काम अत्यंत वेगाने सुरू असून नुकतेच रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निकाली काढण्यास एमएमआरसीएला यश मिळाले आहे.